The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी काव्याचा शिराेमणी “धवळे”

**प्रा . तेजस्विनी कपाटे**
**श्री शिवाजी महाविद्यालय,परभणी.**

**प्रस्तावना:-**

मराठी सारस्वतात महानुभाव साहित्याचे स्थान अनन्यसाधारण आहे .लीळाचरित्र या आद्यग्रंथाने मराठीतील गद्य वाङ्मयाची मुहूर्तमेढ रोवली . तर महदंबेचे धवळे मराठी काव्य सारस्वतातील पहिले मुगुटमणी ठरले. महदंबा या महानुभाव पंथातील एक साधिका आहेत.श्री चक्रधर स्वामींना अपेक्षित असलेल्या आचार- विचार धर्माचे काटेकोरपणे पालन करणारी कवयित्री, धवळेकर्ती ,तपस्विनी, होती अशी तिच्याविषयी महानुभावांची श्रद्धा आहे . तत्कालीन समाजजीवनात स्त्रीच्या पतीव्रताच्या कल्पनेला विशेष महत्त्व होते .स्त्रियांची सामाजिक अवस्था पुरुषसत्ताक असतानाच्या पार्श्वभूमीवर महादाईसाचे कार्य विचार करण्याजोगे आहे.

**चरित्रात्मक तपशील:-**

देवगिरीचा राजा महादेव यांचे पुरोहित वामनाचार्य यांच्या कुळात महदंबेचा जन्म झाला. आपल्या पणजीच्या विद्वतेचा वारसा तिला लाभला होता. असे सांगितले जाते की, महदंबा यांच्या पतीच्या वंशाकडे यादव राज्याचे पुरोहित होते .अतिशय विरक्त आणि विलक्षण बुद्धिमान असलेल्या महदंबेला बालपणीच वैधव्यपण आले. त्या महानुभाव पंथाचे प्रथम आचार्य श्री नागदेवाचार्यांची चुलत भगिनी होय. वेद ,पुराण ,उपनिषद यांचा चांगला अभ्यास त्यांना होता. मुळात त्या संस्कृतविदुषी होत्या. लीळाचरित्र ,श्री गोविंदप्रभुचरित्र ,स्मृतीस्थळ या ग्रंथावरून त्यांचा चरित्रात्मक तपशील आपल्यासमोर येतो. आठशे वर्षांपूर्वी स्त्रियांना सुद्धा ज्ञान अधिकार आहे. असे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी ठासून समाजाला सांगितले एवढेच नाही तर त्यांनी तो अधिकार महिलांना मिळवून दिला. त्याचे प्रमाण म्हणजे नागुबाईसा, आबाईसा, महदाईसा, शांताबाईसा, एकाईसा ,आऊसा, ध्यानाईसा यासारख्या विदूषी स्त्रिया स्वामींच्या सान्निध्यात होत्या. सामाजिक, कौटुंबिक व वैवाहिक अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रिया आत्महतेकडे वळतात. त्यांना स्वामींनी आत्महत्येपासून परावृत्त केले. त्यांना खंबीर विचारांची शिकवण देऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याची शक्ती स्वामींनी स्त्रियांमध्ये निर्माण केली.

**धर्मरक्षक महादाईसा :-**

महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामींच्या परिवारातील एक बुद्धिमान व कर्तुत्ववान शिष्या असा त्यांचा लाैकिक होता. पुराण ऐकल्यानंतर स्वामींना नाना प्रकारचे प्रश्न विचारून आपली जिज्ञासा त्या समाधान करीत. स्वामींनी त्यांच्याबद्दल **म्हातारी जिज्ञासक: म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काही पुसतच असे!** असे उद्गार काढले .स्वामींच्या उत्तरापंथी गमनानंतर भानखेड्याच्या जंगलात पडलेल्या नागदेवास तिने पाठकुळीवर घालून रिद्धपुरात श्री गोविंदप्रभूकडे आणले . श्रीनागदेव, केशराजबास, म्हईंभट्ट त्यांच्यासोबत धर्म वार्तालाप करत असे. स्वामींचे पूर्व आश्रमीचे जीवन

लीळाचरित्र प्रतिबिंबित होण्यामागे महादाईची जिज्ञासक वृत्ती कारणीभूत आहे .म्हणून नागदेवाचार्यांनी म्हातारी धर्मरक्षक: प्रीतीरक्षक: या शब्दात त्यांचा गौरव केला.

**धवळे निर्मिती:-**

रिद्धपुरात राहून श्री गोविंदप्रभूंची निष्ठेने सेवा महदंबेने केली. महादंबेच्या नावावर धवळे, मातृकारुक्मिणीस्वयंवर, गर्भकांड ओव्या, स्फुटपदे आदी रचना आहेत. त्यात सर्वात सहज आणि सुंदर काव्य म्हणजे धवळे होय. श्रीकृष्ण विषयक भक्तीभाव धवळे निर्मितीची उत्स्फूर्त प्रेरकशक्ती आहे .धवळ्यांची परंपरा विवाह गीतातून आलेली आहे. एकदा श्रीगोविंदप्रभुंना विवाह प्रवृत्ती झाली असता वधू हजर नसतानाही हा सोहळा थाटात पार पाडला .यावेळी श्रीकृष्ण नवरदेव समजून रुक्मिणी स्वयंवर गाऊ लागली .चार दिवस तिने हे गाणे गायले व श्री गोविंदप्रभुंनी ऐकले महदाईसेने गायलेले गीत धवळे म्हणून प्रसिद्ध झाले. श्रीकृष्णाच्या रूपसौंदर्याचे वर्णन करताना महदाईसा म्हणते, **"सर्वांगीण देखो तुमचा ओ कांतु देखिये जे अंग तेथोनी न ढवळतीची लाेचन"** धवळे साध्या शब्दाने लिहिलेले सहज सौंदर्याने ओतप्रोत भरलेले कथाकाव्य आहे. धवळ्याची भाषा साधी , सुबोध व तत्कालीन बोलीभाषेच्या रूपाची आहे. प्रसंगचित्रण व व्यक्तीचित्रण असलेली काव्यनिर्मिती अनेक वांग्मयीन पैलूंनी सर्वश्रेष्ठ आहे.

**धवळ्यातील समाजचित्रण :-** धवळ्यातुन तत्कालीन सामाजिक जीवनाचे वास्तव चित्रण हाेते .यादवकालीन विवाह पद्धतीवर प्रकाश दिसतो. संन्याशीपण, निवृत्ती ,जीवनभोगापासून दूर असणारी, महदंबा संवेदनशील, सौंदर्यदृष्टी असलेली ,चौकसपणा, जिज्ञासूपणा असलेली ,सुगरण, गाणे ,रांगोळी सुंदर काढणारी, दक्षकार्यकर्ती होती असे दिसून येते. महदंबेने धवळ्याची निर्मिती करून काव्यात्मक अविष्कार प्रथमच मराठी भाषेत केला. भावी प्रतिभावंतांसाठी स्वतंत्र दर्जा निर्माण करून दिला. अशा भावाेत्कट काव्याचा परिणाम पुढील अनेक कवींवर झालेला दिसून येतो. प्रसंगचित्रण, व्यक्तीचित्रण, भाषाशैली, कथाकाव्याची प्रमुख अंगे या सर्व गोष्टी धवळे या कथाकाव्यात पहावयास मिळतात. भावभावनांचे आविष्कार त्यांचे चढउतार महदंबा अल्पअक्षरात प्रगट करते. विविध प्रसंग खुलवणे, व्यक्तिरेखा साकार करणे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षची मांडणी करणे, हे महदंबाचे काव्यविशेष आहे.

**गर्भकांड ओवी नमुना :-** महदंबाचा काळ हा शके 1164 ते 1234 असा होता. तिचे सर्वकाव्य हे ज्ञानेश्वरी पूर्वीचे आहे. याशिवाय महादंबेच्या नावावर गर्भकांड ओव्या व मातृकीरुक्मिणीस्वयंवर ही दोन काव्य आहेत. शिवाय महदंबा धवळ्यामुळेच मराठीतील आद्य कवयित्री ठरली आहे .

**" ओम नमाे आदिबीजा: परमार्थ सहजा**
**श्री गुरु आदिराजा: नमन माझे: ।। 1।।**
**वीरवयाचे गडदरे: त्येजविले दातारे**
**स्वामी श्री चक्रधरे :महादंबेशी :"**

यावरून महानुभावांच्या लोकसाहित्याची परंपरा किती प्राचीन आहे हे स्पष्ट दिसून येते . महदंबा ही विदुषी होती. तसेच मराठी गीतात महाभारतातील घटनाप्रसंग आणि व्यक्तिरेखा यांची वर्णने पहावयास मिळतात. महाभारतातील पांडव, श्रीकृष्ण, रुक्मिणी, द्रौपदी इत्यादी व्यक्तिरेखा स्त्री मनाला विशेष भावल्या आहेत. पांडवांचा वनवास, द्रौपदी वस्त्रहरण इत्यादी घटनांचे उत्कट चित्रण महदंबेच्या ओव्यातुन पहावयास मिळते.

**शिक्षणाचा अविष्कार :-** हेमाद्री पंडिताचा तो अत्यंत प्रतिकूल काळ होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाची सामाजिक क्रांती घडवणारे श्री चक्रधर स्वामी स्त्री शिक्षणाचे आद्यप्रणेते ठरतात. तत्त्वज्ञानातून स्त्री जीवन जागृती करणारे स्त्री जागृतीचे खरे प्रणेते सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी होय. स्वामींनी आपले विचार-आचार, तत्त्वज्ञान लोकभाषेतून मराठी मायबोलीतून जनसामान्यापर्यंत पोहोचविले. स्त्रीची बौद्धिक आकलण्याची कक्षा पुरुषांपेक्षा रतीभरही कमी नाही. याची जाणीव ठेवून त्या काळात श्री चक्रधर स्वामींनी स्त्रियांना उपदेश केला. याचा पाठपुरावा म्हणून महदंबेचे धवळे आपल्यासमोर दिसतात .स्त्री-पुरुष भेदभाव त्या काळातही स्वामींच्या समोर नव्हता .स्वामींची स्त्री जीवनाकडे पाहण्याचे त्यांच्यातील गुणांचा गौरव करण्याचे आदर करण्याची वृत्तीच स्त्रियांना स्वामींकडे आकर्षित करायची.

**कौतुकास्पद महदंबा:-** महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी यांनी सुद्धा एक महदंबेसारखी चौपदी रचली व गायली आहे.त्याचा उल्लेख लिळाचरित्राच्या उत्तरार्धात लीळा क्र.426 मध्ये आलेला आहे.

**मुळस्थानी:भीड बांधोहो जाई:**
**जोईना काळ कळाई :**
**गुरुवचने वोडियाणा दृढबांधो:**
**जेवि ना चंचळ होई : ।।धृ ।।**

अशाप्रकारे चौपद्यांची निर्मिती त्या काळात झाली . स्रीयांना भगिनी , मातांच्या स्थानी संबोधून त्यांच्यातील अंधश्रद्धेचे निर्मूलन स्वामींनी केले .निरोपणाद्वारे त्यांना मानवता,ईश्वर,गृहव्यवस्था इत्यादींच्या ज्ञानाबरोबर तत्त्वज्ञानाचे धडे देऊन जन्ममरणाच्या चक्रातून स्वतःची सुटका करून ईश्वर प्राप्ती कशी करावी याचे ब्रह्मज्ञान स्वामींनी त्यांना दिले. महाराष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या प्रगत राज्य आहे. धर्म सांप्रदायांनी येथील संस्कृतीला श्रीमंती मिळवून दिली. परंतु महानुभाव संप्रदायांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार त्या काळात समाजासमोर ठेवला हा आधुनिक दृष्टिकोन त्या काळात उदयास आला त्याचा प्रभाव आजही टिकून आहे. धवळे म्हणजे महाराष्ट्राचा आरसा होय.

**उपसंहार : -**

अशाप्रकारे स्त्रीची बौद्धिक पातळी समाजातील पुरुषांनी ओळखली पाहिजे. पुरुषांपेक्षा ती कोणत्या क्षेत्रात मागे नाही असे मत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे त्या काळात होते .कधीकधी तर पुरुषांपेक्षाही ती तिच्या क्षेत्रात अधिक मौल्यवान कार्य करू शकते .आणि सर्वश्रेष्ठ पद गाठू शकते याचे

प्रमाण सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या सन्निध्यात असलेल्या स्त्रियांमध्ये दिसून येते. म्हणूनच स्वामींनी स्त्री मधील सुप्त शक्तींना जागृत करून प्रसंगी शिक्षित व ज्ञानी करून सामर्थ्यशाली बनवले. समाजात एक वेगळी छाप स्त्रियांबद्दल निर्माण केली. स्वामींनी स्त्री शिक्षणाचे व जागृती विषयक केलेले कार्य म्हणजेच स्त्रियांवर केलेले एक प्रकारचे उपकारच होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही .यावरून सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी स्त्री शिक्षणाचे प्रणेते सिद्ध होतात.

**निष्कर्ष :-**

१) महादाईसा हिने रचलेले काव्य भक्तीरसाचा झरा आहे असे असले तरी यादवकालीन महाराष्ट्राचा आरसा म्हणून आपल्याला या ग्रंथाकडे पाहता येईल.

२) स्त्रियांना ईश्वरधर्माचे आचरण करून पुरुषांप्रमाणे आत्मोद्धाराचा समान अधिकार महानुभाव संप्रदायांनी दिला. मराठीच्या आद्यकवयित्री म्हणून धवळेकार महदंबेचे स्थान अजरामर आहे.

३) महानुभावांच्या प्रमुख आम्नाय परंपरेतील अनेक महंती प्रतिष्ठेच्या मूळ निर्मात्या ह्या स्त्रिया आहेत. आजही आश्रमाच्या ,मठ- मंदिराच्या प्रमुख महिलाच आहेत. यावरून महिलांना पुरुषांसमान अधिकार आहे हे दिसून येते.

**संदर्भसुची :-**

१) सर्वज्ञ विशेषांक २०२३
२) महानुभाव साहित्य संशोधन खंड -१ : डॉ.यु.म.पठाण
३) लीळाचरित्र संपा- डॉ.वि.भि.का ेलते
४) लोकसाहित्याचे स्वरूप- प्रभाकर मांडे गोदावरी प्रकाशन

**मराठी काव्याचा शिरा ेमणी “धवळे”**

**प्रा . तेजस्विनी कपाटे**